

देवी कुष्मांडा

हे नवरात्रात पुजल्या जाणाऱ्या नवदुर्गांपैकी चौथे रूप आहे

।। श्री ।।

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ९९ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


## SPOT NEWS

### दिवाळीनंतर यूपीआय व्यवहारांवर शुल्क

**नवी दिल्ली** – दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य ग्राहक आणि व्यापा-यांना मोठा दिलासा देणारा निर्णय नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) घेतला आहे. यूपीआयद्वारे होणाऱ्या विशिष्ट मर्चंट व्यवहारांवर लागू करण्यात येणारे मर्चंट डिस्काउंट रेट(एमडीआर) शुल्क १५ ऑक्टोबरऐवजी आता दिवाळीनंतर लागू करण्यात येणार आहे. एनपीसीआयच्या यूपीआय अँड सर्व्हिसेस स्टीअरिंग कमिटीच्या बैठकीत मंगळवार दि. १३ ऑक्टोबर रोजी यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. डिजिटल इंडियाचा डंका पिटणाऱ्या मोदी सरकारने आता स्मार्ट पेमेंट्सवर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार, व्यापाऱ्यांना २,००० पेक्षा जास्त रकमेच्या सर्व वढक व्यवहारांवर कर भरावा लागणार होता. हा नियम येत्या १५ ऑक्टोबर पासून लागू होणार होता. मात्र मोदी सरकारच्या या निर्णयाला देशभरातून होणा-या विरोधामुळे सरकारने आता हे शुल्क लागू करण्याची तारिख पुढे ढकलली आहे. आता हे शुल्क दिवाळीनंतर लागू केले जाणार आहेत. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने मंगळवारी ही माहिती दिली. सणांच्या खरेदी हंगामात कोणत्याही प्रकारचा अडथळा किंवा गोंधळ निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली

**नवी दिल्ली** – शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी पुढे ढकलण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आज सुनावणी होणार होती आणि शिवसेना शिंदे गटाकडून आपली बाजू मांडली जाणार होती, मात्र आजची सुनावणी ही पुढे ढकलण्यात आली आहे. तीन पैकी एक जरी न्यायमूर्ती अनुपस्थित असतील तर सुनावणी होत नाही. त्यामुळे आता उद्या ही सुनावणी होते का, हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे. याचे कारण म्हणजे आठवड्यातून तीन वेळेसच या संदर्भातील सुनावणी होत असते. मंगळवार, बुधवार आणि गुरुवारी या संदर्भातली सुनावणी होत असते. दरम्यान मागील सुनावणीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना पक्षाच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला होता. महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, शिवसेनेतील उभी फूट, मूळ पक्षनाव, 'धनुष्यबाण' चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेबाबत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाविरोधात मागील सुनावणीत शिंदे गटाकडून युक्तिवाद करण्यात आला होता.

# दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा

## जिल्ह्यात २७ लाखांहून अधिक लाभार्थी | ऑक्टोबर-नोव्हेंबरसाठी २ लाख ८५ हजार ३७८ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी

**अहिल्यानगर | वीरभूमी** –

जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेली पर्जन्यमानातील तूट आणि निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य उपलब्ध करून देणे, वितरणात पारदर्शकता राखणे आणि दुष्काळाच्या काळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी पुरवठा यंत्रणा कार्यरत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी सांगितले.

अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक, उचल आणि रास्तभाव दुकानांमार्फत वितरण या सर्व बाबींचे नियोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात येत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण १० लाख ६० हजार ८७२ अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका आहेत. यापैकी अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील ६ लाख ८४ हजार ६५६ शिधापत्रिकाधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. शासनाच्या नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील नागरिकांना अन्नधान्याचा नियमित लाभ मिळणे महत्त्वाचे असल्याने वितरण प्रक्रियेत अडथळे येऊ नयेत, यासाठी संबंधित यंत्रणेला दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील तालुकानिहाय शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता ३६ हजार ६० मेट्रिक टन आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२६ या



दोन महिन्यांसाठी २ लाख ८५ हजार ३७८ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख ५९ हजार ७०९ क्विंटल अन्नधान्याची उचल पूर्ण झाली आहे.

उर्वरित अन्नधान्याची उचल निर्धारित वेळेत पूर्ण करून रास्तभाव दुकानांमार्फत पात्र लाभार्थ्यांना नियोजनबद्ध पद्धतीने वितरण करण्यावर भर देण्यात येत आहे. उपलब्ध साठा, मंजूर नियतन आणि प्रत्यक्ष वितरणाचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.

### अन्नधान्य उपलब्धतेची स्थिती

१०,६०,८७२ – जिल्ह्यातील एकूण अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका

६,८४,६५६ – अंत्योदय व प्राधान्य शिधापत्रिकाधारक

३६,०६० मे. टन – शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता

२,८५,३७८ क्विंटल – ऑक्टोबर-नोव्हेंबरसाठी मंजूर अन्नधान्याची उचल

१,५९,७०९ क्विंटल – आतापर्यंत पूर्ण झालेली अन्नधान्याची उचल

### पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती

दुष्काळ निवारणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, अन्नधान्य वितरणाची स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षकांमार्फत करण्यात येत आहे.

८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरू असून, पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यात येत आहे.

### नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाच्या निकषांनुसार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार केली जाते. प्राप्त माहितीनुसार, नवीन लाभार्थ्यांच्या निवडीसाठी शहरी भागात वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५९ हजार रुपये, तर ग्रामीण भागात ४४ हजार रुपये विचारात घेतली जाते.

लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करताना संबंधित शासन निर्णय, लागू नियम आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून पुढील कार्यवाही केली जाते.

### 'वन नेशन, वन रेशन कार्ड'मुळे स्थलांतरितांनाही सुविधा

केंद्र शासनाच्या 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध आहे. रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे लाभार्थी दुसऱ्या तालुक्यात, जिल्ह्यात अथवा राज्यात स्थलांतरित झाला, तरी योजनेच्या लागू नियमांनुसार संलग्न रास्तभाव दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेता येतो.

या सुविधेमुळे स्थलांतरित कामगार आणि इतर पात्र लाभार्थ्यांना मूळ गावातील रास्तभाव दुकानावर अवलंबून राहावे लागत नाही.

दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना नियमित अन्नधान्य मिळावे, उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन व्हावे आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखली जावी, याला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे.

### तक्रारी असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळण्यात अडचण येत असल्यास किंवा वितरणाबाबत तक्रार असल्यास त्यांनी संबंधित रास्तभाव दुकानदार, तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग किंवा जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# नीट पेपरफुटी रोखण्यासाठी मास्टरप्लॅन तयार

**नवी दिल्ली | वीरभूमी** –

भारतात वैद्यकीय क्षेत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी नीट (राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा) ही एक केंद्रीय प्रवेश परीक्षा आहे. या परीक्षांमध्ये वारंवार होणा-या पेपरफुटीच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली जात असताना, परीक्षा सुधारणा कार्यगटाचे प्रमुख नंदन निलेकणी यांनी एक महत्त्वपूर्ण सूचना केली आहे.

परीक्षा सुधारणा कार्यगटाचे प्रमुख नंदन निलेकणी यांनी मंगळवार दि. १३ ऑक्टोबर रोजी प्रस्ताव मांडला की, नीट पेपरफुटीचा धोका टाळण्यासाठी, एका मोठ्या प्रश्न-संचयातून प्रश्नपत्रिका ऐनवेळी तयार केल्या जाव्यात. तसेच, त्यांनी संगणक-आधारित परीक्षा पद्धतीकडे वळण्याचीही शिफारस केली आहे. ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलताना नंदन निलेकणी म्हणाले की, ठएएल सारख्या परीक्षांसाठी आधीच तयार करून ठेवलेल्या प्रश्नपत्रिकांमुळे त्या बेकायदेशीरपणे विकण्याचे आर्थिक प्रलोभन निर्माण होते. परीक्षेच्या दिवशीच रँडमली (यादृच्छिक पद्धतीने) प्रश्नपत्रिका तयार केली गेली, तर निश्चित प्रश्नपत्रिकेची समस्याच उरणार नाही आणि परिणामी पेपरफुटीमागील आर्थिक हेतूही संपुष्टात येईल.

परीक्षेच्या दिवशीच एआय द्वारे प्रश्नपत्रिका त्वरित तयार करणे शक्य आहे का, असे विचारले असता निलेकणी यांनी याला स्पष्ट दुजोरा दिला. ते म्हणाले, हो, नक्कीच; आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) परीक्षेच्या दिवशीच एका मोठया प्रश्न-संचयातून प्रश्नपत्रिका तयार करू शकते.

निलेकणी यांनी सर्व परीक्षा संगणक-आधारित परीक्षा पद्धतीने घेतल्या पाहिजेत, यावर भर दिला. ते म्हणाले, नीट सारखी परीक्षा संगणक-आधारित असावी. यासाठी देशभरात परीक्षा केंद्रांचे जाळे आवश्यक आहे. सध्या आपल्याकडे १,५०,००० केंद्रे आहेत, जिथे विद्यार्थी परीक्षा देऊ शकतात.

# राज्यातील आणखी ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर

**मुंबई | वीरभूमी** –

एल निनोच्या प्रभावामुळे कमी झालेले पर्जन्यमान, राज्यातील अनेक भागात पिकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान आणि भासत असलेली तीव्र पाणीटंचाई या पार्श्वभूमीवर राज्यातील सुमारे २६५ तालुक्यांमध्ये काही दिवसांपूर्वीच दुष्काळ जाहीर झाला होता. मात्र आता राज्यातील दुष्काळाची तीव्रता आणखी वाढली असून राज्यातील आणखी ४० तालुक्यांमध्येही दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

त्यामुळे राज्यातील एकूण दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ वर पोहोचली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ही माहिती दिली असून दुष्काळग्रस्त शेतक-यांच्या मदतीसंदर्भातही त्यांनी मोठी घोषणा केली आहे.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत माहिती देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की राज्यात असलेल्या दुष्काळी परिस्थितीबाबत तुम्हा सर्वांना कल्पना आहे. या दुष्काळी परिस्थितीत पहिल्यांदा आपण २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. त्यानंतर काही तालुक्यांतून तक्रारी आल्या होत्या. त्यानंतर ट्रिगर १ आणि ट्रिगर २ चा आढावा घेऊन राज्यातील एकूण ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे.

आधीच्या २६५ दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या संख्येत आणखी ४० तालुक्यांची भर पडली आहे. त्यामुळे दुष्काळात होरपळत असलेल्या बहुतांश महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी दुष्काळात देण्यात येणा-या १२ सवलती देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दुष्काळग्रस्त शेतक-यांच्या मदतीसाठी दिवाळी आधी शेतक-यांच्या खात्यात प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम रक्कम जमा केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. तसेच कर्जमाफीचे पैसेही शेतक-यांच्या खात्यात जमा होत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

# पाथर्डीत चाकूचा धाक दाखवून नऊ लाखांची लूट; चौघे जेरबंद

## दिवसा भर बाजारपेठेत घडलेल्या घटनेचा स्थानिक गुन्हे शाखेने १३ दिवसांत छडा लावला | १ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

**पाथर्डी | वीरभूमी** –

पाथर्डी शहरातील भर बाजारपेठेत चाकूचा धाक दाखवून ६२ वर्षीय दीपक सुधाकर येळाई यांच्याकडील सुमारे नऊ लाख रुपयांची रोकड लुटणाऱ्या टोळीतील चौघांना अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. १ ऑक्टोबर रोजी घडलेल्या या घटनेचा १३ दिवसांत छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून, आरोपींकडून १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दीपक येळाई हे तिसगाव येथील प्लॉट विक्रीचे पैसे घेऊन घरी जात असताना दोन विनाक्रमांकाच्या मोटारसायकलींवरून आलेल्या चार अनोळखी आरोपींनी त्यांना अडवले. आरोपींनी त्यांच्या हातावर लोखंडी सुरा मारून कुकरीचा धाक दाखवला आणि सुमारे नऊ लाख रुपये असलेली पैशांची बॅग बळजबरीने हिसकावून नेली. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११९६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

दिवसा भर बाजारपेठेत घडलेल्या या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली होती. आरोपी काही ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झाले होते. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोउपनि. विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, अतुल लोटके, रणजीत जाधव, बाळासाहेब खेडकर, योगेश कर्डीले, किशोर



शिरसाठ आणि प्रशांत राठोड यांचे पथक तयार केले.

१२ ऑक्टोबर रोजी गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू असताना हा गुन्हा मुदस्सर उर्फ मुज्जु सादीक सय्यद याने साथीदारांसह केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार एम.एम. निऱ्हाळी हायस्कूलजवळ, माणिकदौंडी रोड, पाथर्डी येथून मुदस्सर उर्फ मुज्जु सादीक सय्यद (वय २२, रा. एडके कॉलनी, पाथर्डी) याला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत त्याने गुन्ह्यात सहभागी साथीदारांची माहिती दिल्यानंतर सुरज संतोष वडागळे (रा. बेल्हेकरवाडी रोड, सोनई), आकाश शरद हराळे (रा. सोनई) आणि इसाक पापा शेख (रा. दुलेचांदगाव, पाथर्डी) यांना ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत मुदस्सर सय्यद याने चोरीच्या रकमेपैकी त्याच्या वाट्याला दोन लाख रुपये आल्याचे सांगितले. त्यापैकी ३० हजार रुपये खर्च केले असून उर्वरित रक्कम घरी ठेवल्याची माहिती त्याने दिली. पंचांसमक्ष पोलिसांनी १ लाख ७० हजार रुपये रोख, एक पिशवी आणि १० हजार रुपये किमतीचा मोबाईल, असा एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या गुन्ह्यात साहिल खान (रा. तिसगाव), राजू ठाकूर (रा. दिल्ली), विशाल ब्राम्हणे (रा. शनिशिंगणापूर), सोमनाथ रमेश काळोखे (रा. पाथर्डी) तसेच राजू ठाकूरचे गोपाल व अन्य एक साथीदार सहभागी असल्याची माहिती तपासात समोर आली असून, त्यांचा शोध सुरू आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने पुढील तपासासाठी पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

## SPOT NEWS

### अहिल्यानगरमध्ये प्रथमच महिलांसाठी भव्य 'लाईव्ह दांडिया नाईट'

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
नवरात्रोत्सवानिमित्त अहिल्यानगर शहरात प्रथमच केवळ महिलांसाठी 'भव्य लाईव्ह दांडिया नाईट २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. नगर जल्लोष ट्रस्ट आणि आरव्ही ग्रुप ऑफ इव्हेंट्सतर्फे आयोजित हा कार्यक्रम शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता सावेडी येथील संजोग लॉन्समध्ये होणार आहे. प्रतिष्ठा एथनिक हे मुख्य प्रायोजक आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण अभिनेत्री धनश्री कडगावकर ('तुझ्यात जीव रंगला' फेम वहिनीसाहेब) असणार आहेत. तसेच सेलिब्रिटी अँकर व गायक संदीप पाटील, गायिका मुग्धा कऱ्हाडे आणि इंडियन आयडॉल फेम गायक कैवल्य केजकर यांचे लाईव्ह परफॉर्मन्स होणार आहेत. महिलांच्या सुरक्षिततेसह मनोरंजनाला प्राधान्य देत आयोजित या कार्यक्रमात महा लकी ड्रॉचेही आयोजन करण्यात आले आहे. कस्तुरी साडीजतर्फे नऊ पैठण्या, तर सहदेव ज्वेलर्सतर्फे नऊ सोन्याच्या नथी जिंकण्याची संधी महिलांना मिळणार आहे. प्रवेश शुल्क ३९९ रुपये असून प्रत्येक प्रवेशिकेला स्नॅक्स व पाण्याची बाटली मोफत देण्यात येणार आहे. सहदेव ज्वेलर्स हे प्रायोजक, तर कुबेर मार्केट, व्ही प्लस आणि स्वामिनी मेकअप हे सहप्रायोजक आहेत. सशुल्क पासेससाठी शहरातील विविध ठिकाणी संपर्क केंद्र सुरू करण्यात आली आहेत. अधिक माहितीसाठी ७७७४०७७८४४ / ९८६०६१२०४५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### तुळजाभवानी मातेच्या पालखीचे नगर शहरात उत्साहात स्वागत

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी मातेच्या पालखीचे नगर शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले. पालखीचे शहरात आगमन झाल्याने नवरात्रोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात आणखी भर पडली असून, विविध ठिकाणी धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती पालखीचे मानकरी सागर भगत यांनी दिली. भगत म्हणाले, तुळजाभवानी देवीच्या पालखीचा नगर शहरातील मुक्काम नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या माळेला असतो. श्रीक्षेत्र तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीच्या दसऱ्याच्या सीमोल्लंघनासाठी दरवर्षी नवीन पालखी तयार केली जाते. या पालखीच्या निर्मितीसाठी सुमारे २०० वर्षे जुना पौराणिक दांडा वापरण्याची परंपरा आहे. राहुरी येथे या ऐतिहासिक दांड्यावर नवीन पालखी तयार करण्यात येते. त्यानंतर नगरजवळील हिंगणगाव येथे तिची पुनर्बांधणी केली जाते. तुळजाभवानी देवीच्या पालखीचा मान पूर्वापार परंपरेनुसार भगत कुटुंबाकडे आहे. दरवर्षी दसऱ्याच्या सीमोल्लंघनासाठी नवीन पालखी नगरमधून श्रीक्षेत्र तुळजापूरकडे रवाना होते.नवीन पालखी तयार झाल्यानंतर राहुरी येथून पालखी सोहळ्याला सुरुवात होते. सालाबादप्रमाणे राहुरी, पारनेर आणि नगर तालुक्यातील सुमारे ४० गावांमधून पालखी जात असून, प्रत्येक गावात धार्मिक कार्यक्रम व यात्रा भरवण्यात येते. हजारो भाविक या पालखी सोहळ्यात सहभागी होतात. नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या माळेला पालखी नगरमध्ये आल्यानंतर येथून ती श्रीक्षेत्र तुळजापूरकडे रवाना होते. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनाच्या सोहळ्यात तुळजाभवानी मातेची पालखीत प्रतिष्ठापना केली जाते. नगर शहरातील नालेगाव व दिल्लीगेट परिसरात पालखीचे आगमन झाल्यानंतर कवडे बंधू, जिव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा वनिता मानकर, कल्याणी पावले, जिव्हेश्वर मंडळाचे सचिव सचिन पावले आदींनी पालखीचे पूजन केले. यावेळी पालखीचे मुख्य मानकरी व बुऱ्हाणनगर देवीचे पुजारी सुदाम जगन्नाथ भगत, ज्ञानेश्वर गोकुळ भगत, शिवराम उत्तम भगत, संतोष मधुकर भगत, देवीदास भीमराव भगत, सागर बाळासाहेब भगत, दीपक प्रभाकर भगत, वसंत गणपत भगत, निलेश बद्रीनाथ भगत आणि मंगेश शिवाजी भगत यांचा सन्मान करण्यात आला.

# श्री मोहटादेवी मंदिराची 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

## श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्टच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याची दखल

● **पाथर्डी । वीरभूमी –**
पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिराची 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद झाली आहे. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे देवस्थान यांच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध शक्तिपीठांपैकी एक म्हणून श्री मोहटादेवी मंदिराची ओळख आहे. मंदिराच्या नवनिर्मित, भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण श्रीमंत्राच्या आकारातील वास्तुरचनेमुळे देवस्थानाला देशभरात वेगळी ओळख मिळत आहे. मंदिरातील आध्यात्मिक वातावरण भाविकांना आकर्षित करते. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात मोहटा गावाजवळ असलेल्या या देवस्थानात वर्षभर भाविक दर्शनासाठी येतात. नवरात्रोत्सवात येथे विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.



भक्ती, आध्यात्मिक वारसा आणि धार्मिक परंपरांचे जतन करण्यासाठी देवस्थानाने केलेल्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. तसेच भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधा, धार्मिक समारंभांचे आयोजन, सांस्कृतिक उपक्रमांचे जतन आणि आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार यातील योगदानाचाही गौरव करण्यात आला.

'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'च्या धार्मिक वारसा आणि आध्यात्मिक सेवा या श्रेणीअंतर्गत मंदिराची नोंद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेले मोहटादेवी मंदिर श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक परंपरांचे केंद्र म्हणून ओळखले जाते. पवित्र टेकड्यांच्या परिसरात वसलेल्या या मंदिरात भाविक आध्यात्मिक शांती, देवीचे दर्शन आणि पारंपरिक धार्मिक विधींसाठी मोठ्या श्रद्धेने येतात.

या विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'च्या सचिव सुप्रिया अनिकेत हरके, विहान अनिकेत हरके आणि १८४ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय म्हणून उल्लेख असलेले संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी श्री मोहटादेवी देवस्थानचे विश्वस्त, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, कर्मचारीवर्ग आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिवाळीपूर्वी थकीत वेतन फरक द्या; पेन्शनर्सचे महापालिका प्रवेशद्वारात धरणे आंदोलन!

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
दिवाळीचा सण तोंडावर आला असताना अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने मंगळवारी (दि. १३ ऑक्टोबर) महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन करण्यात आले. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी वसंत कर्मचाऱ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आपली व्यथा मांडली. दिवाळीपूर्वी थकीत रक्कम अदा करून पेन्शनधारकांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, रंगनाथ गावडे, संजीव परशरामी, मधुकर खताळ, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, ज्ञानेश्वर धिरडे, दिलीप पाठक, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर कासिद, हिरामन जाधव, आर.बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, सौ. रंजना भोसले, लता महाले, मिरा चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान मनपा कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सतीश साठे यांनी या आंदोलनास पाठिंबा दिला.

महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतन आयोगाच्या थकीतरकमेचाप्रश्नअनेकदिवसांपासून प्रलंबित असल्याचे संघटनेने यावेळी निदर्शनास आणून दिले. संघटनेच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन निर्णयानुसार महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. मात्र, ही रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्याचप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप प्रलंबित असून, या हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेने सांगितले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात महापालिकेच्या कामकाजासाठी योगदान दिले आहे. त्यामुळे नियमानुसार आणि न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम मिळण्यासाठी त्यांना वारंवार आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात अस्मिता खेलो इंडिया वेटलिफ्टिंग लीग

### महिला व मुलींना क्रीडा क्षेत्रात व्यासपीठ । आठ वजन गटांत स्पर्धा



● **पाथर्डी । वीरभूमी–**
केंद्र शासनाच्या खेलो इंडिया उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण व भारतीय वेटलिफ्टिंग संघटनेच्या संयुक्त विद्यमाने, तसेच अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेच्या मार्गदर्शनाखाली बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियममध्ये जिल्हास्तरीय अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स वेटलिफ्टिंग लीग उत्साहात पार पडली.

देशातील महिला व मुलींना खेळाशी जोडून तळागाळातील स्तरावर क्रीडा व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, क्रीडा संचालक तथा जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे सचिव डॉ. विजय देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, प्रा. विवेक साळवे, सोनाली साबळे आणि विजय कनोजिया उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अभय आव्हाड म्हणाले की, मुलींना योग्य व्यासपीठ आणि संधी मिळाल्यास त्या क्रीडा क्षेत्रात यशाची नवी शिखरे गाठून देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात.

स्पर्धेत आठ वजन गटांत मुलींनी स्नॅच तसेच क्लीन अँड जर्क प्रकारात कौशल्याचे प्रदर्शन केले.

सुवर्णपदक : समीक्षा थोरात, नुसरत सय्यद, शुभांगी ढाकणे, श्रुती धायतडक, सानिका शिवणकर, पूनम काकडे, अंबिका बोरुडे आणि ऋतुजा धोत्रे.

रौप्यपदक : शिवानी सांगळे, दैवशाला वाघमोडे, अनुराधा घुले, प्रणया हाडदे, तेजस्विनी बोरुडे, ज्ञानेश्वरी नवघरे आणि तन्वी सरोदे.

कांस्यपदक : कल्याणी घुले, राणी रूपनर, वैष्णवी भताने, तेजस्वी वाकळे, समीक्षा सय्यद आणि श्रावणी पालवे.

स्पर्धेसाठी तुषार सपकाळे, प्रवीण चोरमले, प्रा. विवेक साळवे, सोनाली साबळे, कार्तिक तेवर, विजय कनोजिया आणि प्रशांत गायकवाड यांनी पंच म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय देशमुख यांनी केले, तर राजेंद्र सोनवणे यांनी आभार मानले.

# प्रत्येक क्षेत्रात महिलांचे कार्य प्रेरणादायी : मंगल कोकाटे

## पाथर्डीत तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात । १३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

● **पाथर्डी । वीरभूमी–**
आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय योगदान दिल्याने त्यांचे स्थान अग्रस्थानी निर्माण झाले आहे. क्रीडा क्षेत्रातही महिलांनी उत्तुंग भरारी घेतली असून, त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन पाथर्डी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या अंतर्गत बाबुजी आव्हाड महाविद्यालय व श्री विवेकानंद विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने पाथर्डी येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या. मुलांच्या तसेच मुलींच्या या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी कोकाटे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अभय आव्हाड होते.

यावेळी अभय आव्हाड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्रीडा क्षेत्र अत्यावश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपली कला व क्षमता सिद्ध करण्यासाठी खेळ उत्तम संधी देतो. खेळातून शिस्त, संघभावना आणि मेहनतीची प्रेरणा मिळते. त्यामुळे सक्षम पिढी घडविण्यास मदत होते. खेळ ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासाचा पाया आहे. ग्रामीण भागातील अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला खेळाडूंचे योगदानही महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या कामगिरीमुळे देशाला अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये पदके मिळाली आहेत.

यावेळी नगरसेविका शारदाताई गर्जे, किरण खेडकर, वर्षा मोरे, मनीषा उदमले, वंदना टेके, प्राचार्य डॉ. बबन चौरे, मुख्याध्यापक शरद मेढे, शिक्षक बँकेचे संचालक छबुराव फुंदे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, संपत घारे, महिला क्रीडा शिक्षिका वृषाली कर्नावट, शुभांगी दिवटे, वर्षा अकोलकर, प्रमोद हंडाळ आदी उपस्थित होते. यावेळी सर्व महिला क्रीडा शिक्षकांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका क्रीडा समितीचे प्रमुख सचिन शिरसाठ यांनी केले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके यांनी केले, तर आभार शरद मेढे यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तालुका क्रीडा समितीचे पदाधिकारी व क्रीडा शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### १३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

■ तालुक्यातील विविध शाळांमधील १३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. मुला-मुलींसाठी स्वतंत्र तीन वयोगटांत सामने खेळवण्यात आले. प्रत्येक गटातील प्रथम तीन संघांना अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान, पाथर्डी यांच्या वतीने पारितोषिके जाहीर करण्यात आली. चुरशीच्या लढतींमध्ये विद्यार्थ्यांनी कौशल्य, वेग आणि संघभावनेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेच्या आयोजनासाठी स्थानिक क्रीडा शिक्षक व आयोजकांनी विशेष मेहनत घेतली.

SPOT NEWS

## १४ वर्षांखालील आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीला विजेतपद

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

१४ वर्षांखालील आंतरशालेय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत दिमाखदार यश संपादन केले. सांघिक समन्वय, अफाट चपळाई, अचूक खेळ आणि विजयासाठीची जिद्दीच्या बळावर खेळाडूंनी स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली. केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या या यशस्वी संघातील सर्व खेळाडू पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, केडगाव येथे शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करण्याची क्षमता या खेळाडूंनी सिद्ध केली आहे. स्पर्धे दरम्यान खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध केलेली प्रभावी रणनीती आणि एकजुटीने केलेला खेळ यामुळे संघाला प्रथम क्रमांक मिळवण्यात यश आले. अंतिम सामन्यातही खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध करत विजयावर शिक्कामोर्तब केले. या यशस्वी संघाला केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि स्वाती बारहाते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या कौशल्यविकासासाठी नियमित सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण, सांघिक खेळाचे महत्त्व आणि सामन्यातील योग्य रणनीती यावर त्यांनी विशेष भर दिला. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध करावी, या उद्देशाने अकॅडमीच्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात आहे.

# पशुधन सर्वेक्षणातून चारा उत्पादनाचा ‘अहिल्यानगर पॅटर्न’

**मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनंतर पशुसंवर्धन विभागाचा तालुकानिहाय आराखडा । ६४ हजार पशुपालकांकडून माहिती संकलित**

**● लोणी । वीरभूमी–**

टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाने तालुकानिहाय सर्वेक्षण सुरू केले असून, जिल्ह्यातील ६४ हजार पशुपालकांकडून पशुधनाची माहिती संकलित करण्यात आली आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनुसार टंचाईच्या परिस्थितीत चारा उत्पादनाचे नियोजन करण्यासाठी ‘अहिल्यानगर पॅटर्न’ तयार करण्यात येत असून, यामुळे पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.




पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेतल्या. या बैठकीत चारा टंचाईबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या. पशुधनाची उपलब्ध आकडेवारी, चारा उत्पादनाचे नियोजन आणि बियाणे वाटपातील त्रुटी लक्षात घेऊन प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी पशुसंवर्धन विभागाला दिल्या.

या आराखड्यासाठी प्रत्येक तालुक्यातील पशुपालकांची संख्या, पशुधनाची संख्या, चारा उत्पादन करणारे शेतकरी, चाऱ्यासाठी मागणी करणारे शेतकरी तसेच शासनाच्या योजनेतून मोफत बियाणे घेऊन चारा उत्पादन करण्यास इच्छुक शेतकऱ्यांची माहिती संकलित केली जात आहे. यासाठी मंत्री विखे पाटील यांच्या संकल्पनेतून विशेष प्रारूप तयार करण्यात आले आहे.

पावसाअभावी यंदाचे चारा पीक धोक्यात आले आहे. त्यामुळे टंचाईच्या काळात पशुधनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने चारा उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रित करावे, अशा सूचना पालकमंत्री विखे पाटील यांनी वेळोवेळी दिल्या आहेत.

पशुसंवर्धन विभागातील वरिष्ठ तसेच क्षेत्रीय अधिकारी संपूर्ण जिल्ह्यात सर्वेक्षणाचे काम करीत आहेत. अहिल्यानगर जिल्हा दूध उत्पादनासाठी राज्यातील प्रमुख जिल्ह्यांपैकी एक असून, जिल्ह्यात पशुधनाची संख्या मोठी आहे. त्यामुळे टंचाईच्या विविध परिस्थितीत चारा उपलब्धतेचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

पशुसंवर्धन विभागाने यापूर्वी पशुधनाची गणना करून जनावरांचे टॅगिंग केले आहे. त्यामुळे जनावरांच्या नोंदी उपलब्ध असून, नव्या सर्वेक्षणातून त्यांची पुन्हा पडताळणी केली जात आहे. यामुळे पशुधनाची अचूक संख्या, चाऱ्याची मागणी आणि भविष्यातील नियोजन अधिक प्रभावीपणे करण्यास मदत होणार आहे.

### हायड्रोफोनिक्सद्वारे चारा उत्पादनावर भर

■ चारा उत्पादनासाठी हायड्रोफोनिक्स तंत्रज्ञानाचा उपयोग करावा, अशी आग्रही भूमिका पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे. टंचाई आढावा बैठकीत त्यांनी याचा आवर्जून उल्लेख केला असून, पशुसंवर्धन विभागाने प्रायोगिक तत्त्वावर हायड्रोफोनिक्सद्वारे चारा उत्पादनाची सुरुवात करावी, यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली आहे.

# कोयाळी पुनर्वसन शाळेत जादूच्या प्रयोगांनी विद्यार्थी मंत्रमुग्ध

**माजी उपसरपंच त्रिनयनशेठ कळमकर यांच्या सौजन्याने ‘मनोरंजनातून शिक्षणाकडे’ उपक्रम**

**● शिरूर । वीरभूमी –**

तालुक्यातील कोयाळी पुनर्वसन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी ‘मनोरंजनातून शिक्षणाकडे’ या संकल्पनेवर आधारित जादूच्या प्रयोगांचा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. शिक्रापूरचे माजी उपसरपंच त्रिनयनशेठ बाप्पुसाहेब कळमकर यांच्या सौजन्याने आणि अरुण वाळुंज टॉक्स व्यासपीठाच्या माध्यमातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.




महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध जादूचे प्रयोग आणि कसरती सादर केल्या. कानातून रुमाल काढणे, फुल गायब करणे, हातचलाखीचे प्रयोग तसेच विविध थरारक कसरतींनी विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांचेही मनोरंजन केले. विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक प्रयोगाचा आनंद घेतला.

यावेळी सौजन्यदाते त्रिनयनशेठ कळमकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. जादूच्या प्रयोगांच्या माध्यमातून अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षण क्षमता आणि सर्जनशीलता विकसित होण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे संयोजक आणि चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी ‘राजे छत्रपती’ आणि ‘चांदोबाची आई’ या कविता सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. अशा प्रकारचे जादूचे प्रयोग प्रत्येक शाळेत राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड, बगाटे सर, गांजे सर, शिंदे मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य राहुलशेठ सासवडे, तुषार देशमुख, रामदास गायकवाड, विठ्ठलराव जाधव, अभिमन्यू काटकर, राजू गायकर यांच्यासह शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सृष्टी बोरुडेची बुद्धिबळात दमदार कामगिरी

**सर्व डाव जिंकत प्रथम क्रमांक । नांदेडच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी येथील स्वामी समर्थ शाळेची विद्यार्थिनी सृष्टी दीपक बोरुडे हिने शालेय बुद्धिबळ स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. सलग दोन स्पर्धांमध्ये एकही डाव न गमावता सर्व सहा डाव जिंकण्याची कामगिरी तिने केली. या यशामुळे नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत पाथर्डीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तिला मिळाली आहे.

दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत ६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सृष्टीने या स्पर्धेत सर्व सहा डाव जिंकून सहा गुणांची कमाई केली आणि प्रथम क्रमांक मिळवत पुणे विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.



त्यानंतर दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दौंड येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतही सृष्टीने आपली विजयी घोडदौड कायम ठेवत सहापैकी सहाही डाव जिंकले आणि प्रथम क्रमांक पटकावला. सलग दोन स्पर्धांमध्ये सर्व डाव जिंकण्याच्या तिच्या कामगिरीने लक्ष वेधून घेतले.

सृष्टीला बुद्धिबळ प्रशिक्षक प्रज्वल आव्हाड आणि सनी गुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. सातत्यपूर्ण सराव, एकाग्रता आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनातून तिने हे यश संपादन केले.

सृष्टीच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतही ती चमकदार कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सलग दोन स्पर्धांमध्ये सर्व डाव जिंकत सृष्टी बोरुडे हिने आपल्या बुद्धिचातुर्याचा आणि सातत्यपूर्ण खेळाचा ठसा उमटवला आहे. आता नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत पाथर्डीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तिला मिळाली आहे. तिच्या या यशामुळे पाथर्डीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतही सृष्टी यशाची नवी उंची गाठेल, असा विश्वास आनंद चेस क्लबचे अध्यक्ष डॉ. विनय कुचेरीया यांनी व्यक्त केला.

# महालक्ष्मी मंदिरात नवरात्रोत्सवासाठी भाविकांची गर्दी

**सकाळ-संध्याकाळ दर्शनासाठी अबालवृद्धांची उपस्थिती । आकर्षक विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळला**

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले शहरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या श्री महालक्ष्मी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त सकाळ–संध्याकाळ दर्शनासाठी अबालवृद्धांची मोठी गर्दी होत आहे. महालक्ष्मी देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, मंदिर परिसरातील आकर्षक विद्युत रोषणाई भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

दरवर्षी नवरात्रोत्सवात महालक्ष्मी मंदिरात मोठा उत्सव साजरा केला जातो. महालक्ष्मी देवस्थान ट्रस्टने अलीकडच्या काळात मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. सभामंडप, भक्तनिवास, आकर्षक फरशी, दीपमाळ, नवीन कलश, संरक्षक भिंत, पाण्याची टाकी आणि प्रवेशद्वार आदी सुविधांमुळे मंदिराचा परिसर अधिक आकर्षक झाला आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त देवस्थान ट्रस्ट व आधार रक्तपेढी, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. नवरात्राच्या पहिल्या माळेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे. मंदिर परिसरात विविध लहान–मोठी दुकाने थाटण्यात आली आहेत. लहान मुलांसाठी खेळणी, ट्रेन, छोटे रहाटगाडगे, जंपिंग जॅक तसेच खाऊ गल्लीमुळे परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

महालक्ष्मी देवस्थानचा ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्रात समावेश व्हावा, यासाठी पाठपुरावा सुरू आहे. मुख्यमंत्री सडक योजनेतून अगस्ती कारखाना रोडपासून अंबिका लॉन्सपर्यंत महालक्ष्मी रस्त्याचे काँक्रिटीकरण, तर त्यापुढील रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे.

भाविकांच्या सुविधेसाठी ट्रस्टच्या वतीने भक्तनिवास व स्वच्छतागृहाची कामे सुरू आहेत. तसेच लवकरच ट्रस्टचे कार्यालय सुरू करण्यात येणार असल्याची माहिती महालक्ष्मी देवस्थान ट्रस्टचे सचिव तथा अकोले नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांनी दिली.

श्री क्षेत्र महालक्ष्मी देवस्थानच्या विकासासाठी जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, ट्रस्टचे अध्यक्ष किसनराव लहामगे, सचिव बाळासाहेब वडजे, खजिनदार सुरेश शिंदे, विश्वस्त रमेश नाईकवाडी, संजय जाधव, भानुदास वाकचौरे, निलेश देशमुख, अमोल वैद्य, खंडू भरितकर, बाळकृष्ण लोंढे, रामनिवास राठी, सुरेश लोढा, शिवाजी वडजे, सुधाकर शाळीग्राम, शिरीष देशपांडे, दत्तात्रय वाणी, अनिल गायकवाड, अनिल जोशी, सुनील कोटकर, संतोष कचरे, प्रकाश देशमुख, श्रेयश जोशी, डॉ. योगी कुलकर्णी, रोहिदास धुमाळ, बबलू शेणकर, अशोक शेणकर, दिनेश नाईकवाडी, रामचंद्र कुलकर्णी, मधुकरराव बिबवे, पुंडलीक गवंडी, के. डी. देशमुख, सतीश रावअंदुरे, श्रीनिवास रेणूकदास, पी. के. शिंदे, भगवान वाकचौरे, विनोद रासने, अनिल गाडे, सर्जेराव फटांगरे, डॉ. विराज शिंदे, अशोक सावंत, सुरेश खांडगे, भागवत त्रिभुवन, प्रा. अनिल मंडलिक, संतोष बाणाईत, योगेश देशमुख, अशोक शिंदे, प्रभाकर आवारी, संजय गुगळे, सूर्यभान वडजे, नितीन गायकवाड, संपत गायकवाड, मंगेश भरीतकर, बाळू



देवराम वडजे, दत्ता गायकवाड, निखिल भरीतकर, बाळासाहेब भरीतकर, संतोष भोत, मंगेश गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, नारायण गायकवाड, अमोल भरीतकर, दत्तात्रय वडजे आदी प्रयत्नशील आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# अकोलेच्या हक्काच्या पाण्यासाठी रस्त्यावर उतरा

**आमदार डॉ. किरण लहामटे यांची भूमिका | वर्षभरात तालुक्यातून किती पाणी गेले, याचे ऑडिट करण्याची मागणी करणार**

**● अकोले | वीरभूमी –**

अकोले तालुक्याच्या हक्काचे पाणी मिळविण्यासाठी सर्वांनी रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माझ्यात कोणताही वाद नाही. पाण्याबाबतची माझी भूमिका यापूर्वीही स्पष्ट केली आहे. तालुक्यातून वर्षभरात किती पाणी बाहेर गेले, याचे ऑडिट करण्याची मागणी करणार असल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी सांगितले.

अगस्ती सहकारी साखर कारखान्याचा ३३ वा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते झाला. कारखान्याचे चेअरमन सीताराम पाटील गायकर अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी श्री. व सौ. रमाकांत भाटे आणि श्री. व सौ. संभाजी कानवडे यांच्या हस्ते बॉयलरची विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार डॉ. लहामटे म्हणाले की, दुष्काळजन्य परिस्थितीमुळे सर्वच साखर कारखान्यांसमोर अडचणी आहेत. 'आमच्या हक्काचे पाणी आम्हाला राहू द्या,' ही आपली पहिल्यापासूनची भूमिका आहे. कामगार आणि शेतकऱ्यांच्या त्यागातून अगस्ती कारखाना सुरू आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली, तरी मागे हटता कामा नये. विकासकामे सुरूच राहतील; मात्र दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाणे हे मोठे आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले की, भंडारदरा व निळवंडे धरणांच्या पाण्याच्या कथित उधळपट्टीच्या प्रश्नावर तालुक्याचा भूमिपुत्र म्हणून आपण अकोलेकरांसोबत आहोत. 'धरण उशाशी आणि कोरड घशाला' अशी विदारक स्थिती आदिवासी भागात आहे. अगस्ती कारखान्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून आवश्यक ती मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

दुष्काळी व प्रतिकूल परिस्थितीतही कारखाना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अगस्ती हा अकोले तालुक्याचा आधार असून, तो टिकविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन खासदार वाकचौरे यांनी केले. तसेच कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील सील कोटच्या कामासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

अध्यक्षीय भाषणात चेअरमन सीताराम पाटील गायकर म्हणाले की, अगस्ती कारखान्यासमोर अनेक अडचणी असतानाही तो सुरू व्हावा, अशी सर्वांची इच्छा होती. शेतकरी व कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करण्यात



येतील. राज्य सरकारने सॉफ्ट लोन मंजूर केल्याने कारखान्याला दिलासा मिळाला आहे. अगस्ती कारखाना बंद पडल्यास तो पुन्हा सुरू करणे कठीण होईल. त्यामुळे सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांच्या इच्छेनुसार कारखाना सुरू करण्यात आला आहे.

कारखान्याच्या स्थापनेपासून शेतकऱ्यांनी इतर कारखान्यांच्या तुलनेत कमी भाव स्वीकारून सहकार्य केले आहे. कारखाना सुरू राहावा, ही शेतकऱ्यांची अपेक्षा त्यातून स्पष्ट होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आपला ऊस अगस्ती कारखान्यालाच घालावा, असे आवाहन गायकर यांनी केले.

अगस्ती पतसंस्थेचे माजी चेअरमन बाळासाहेब भोर आणि कारखान्याचे संचालक मच्छिंद्र धुमाळ यांनी निळवंडे धरणातून गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या आवर्तनामुळे पाण्याची उधळपट्टी होत असल्याची भीती व्यक्त केली. या पाण्याच्या वापराचा फटका भविष्यात दुष्काळी परिस्थितीत अकोले तालुक्याला बसू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी राष्ट्रवादी किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ज्येष्ठ नेते विजयराव वाकचौरे यांचीही भाषणे झाली.

प्रास्ताविकात ज्येष्ठ संचालक परबतराव नाईकवाडी यांनी यंदा दुष्काळजन्य परिस्थिती असल्याचे सांगितले. मागील तीन वर्षे चांगला पाऊस होऊनही उसाचे उत्पादन अपेक्षेप्रमाणे वाढले नाही. साखर कारखाना हा प्रक्रिया उद्योग असल्याने ऊस, कामगारांचे वेतन, ऊसतोडणी मजुरांचा खर्च आणि इतर प्रक्रिया खर्चाचा विचार करून गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक आहे. यंदा कार्यक्षेत्रातील दोन लाख टन आणि बाहेरील दोन लाख टन, असे एकूण चार लाख टन उसाचे गाळप करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन नामदेव शेटे यांनी केले, तर ज्येष्ठ संचालक अशोकराव आरोटे यांनी आभार मानले.

### कारखाना रस्त्यासाठी २० लाखांचा निधी

■ अगस्ती साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील सील कोटच्या कामासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी केली.

### उर्वरित आयुष्य अगस्तीसाठी समर्पित करणार

■ वर्षभर आजारी होतो; मात्र आता आजारपणातून सावरलो आहे. त्यामुळे उर्वरित आयुष्य अगस्ती सहकारी साखर कारखान्यासाठी समर्पित करणार असल्याचा निर्धार चेअरमन सीताराम पाटील गायकर यांनी व्यक्त केला.

## कोपरगाव मतदार संघातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जास्तीत जास्त टँकरची तरतूद करा : आ.आशुतोष काळे

**● कोपरगाव | वीरभूमी–**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरीकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये यासाठी आराखडा तयार करतांना गोदावरी कालव्यांच्या लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांची गावे वगळता तालुक्यातील इतर सर्व गावांना जास्तीत जास्त टँकर वेळेवर उपलब्ध होतील असा आराखडा तयार करा. तसेच कालव्यांना वेळेत आवर्तन न मिळाल्यास लाभक्षेत्रातील त्या गावांनाही टँकरने पाणीपुरवठा करण्याची गरज भासणार आहे. त्यामुळे सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून पिण्याच्या पाण्याचे जास्तीत जास्त टँकर उपलब्ध होतील अशी आराखड्यात तरतूद करावी अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी पंचायत समिती प्रशासनाला दिल्या.

कोपरगाव तालुक्यात अतिशय कमी पर्जन्यमान झाल्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून आमदार आशुतोष काळे यांनी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केल्यामुळे कोपरगाव मतदार संघ दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात येवून ट्रिगर-१ लागू करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर शेती पिकांचे पंचनामे करून करावयाच्या तातडीच्या उपाय योजना राबविल्या जात आहेत. त्यादृष्टीने पंचायत समितीच्या वतीने शासनाच्या आदेशानुसार संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून आराखडा तयार करण्यात येत असून याबाबत आमदार आशुतोष काळे यांनी पंचायत समिती प्रशासनाला महत्वपूर्ण सूचना केल्या आहेत.



जून महिना कोरडाठाक गेल्यामुळे भविष्यातील संकटाची चाहूल लागली होती. परंतु जुलै महिन्यात काहीसा समाधानकारक व धरणक्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे गोदावरी नदीला ओव्हरफ्लोचे पाणी सोडण्यात आले होते. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी ओव्हरफ्लोचे पाणी गोदावरी कालव्यांना सोडण्याच्या केलेल्या मागणीनुसार गोदावरी कालव्यांना सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे तालुक्यातील बंधारे, गाव तलाव आणि पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरले होते. परंतु ऑगस्ट, सप्टेबर आणि निम्मा ऑक्टोबर महिना संपत आला असून पाऊस होण्याच्या आशा जवळपास मावळल्या आहेत.सध्या काही प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असला तरी भविष्यात गोदावरी कालवे लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांची गावे वगळता सर्वच गावांना टँकर सुरु करावे लागणार आहे. त्यामुळे आराखड्यात या गावांना जास्तीत जास्त टँकर मिळण्याची तरतूद करावी.

तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने भूजल पातळी खालावत चालली असून बाष्पीभवनाचे प्रमाण पण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. गोदावरी कालव्यांना वेळेत आवर्तन मिळाले तर कालव्यांच्या लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या गावांना अडचणी येतील असे वाटत नाही. परंतु पुढील परिस्थिती कशी असेल याबाबत आजच अंदाज बांधता येणार नाही. त्यामुळे यदाकदाचित जर वेळेवर आवर्तन मिळाले नाही तर या गावांना देखील टँकरने पाणी पुरवठा करावा लागणार आहे याची गांभीर्याने दखल घेवून त्याबाबत आराखड्यात नियोजन करून शासनाकडे जास्तीत जास्त टँकरची आराखड्यात तरतूद करावी अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी पंचायत समिती प्रशासनाला दिल्या आहे.

## नंदकिशोर वाघमारे यांचा मनसेत प्रवेश

**शेवगाव शहराध्यक्षपदाची जबाबदारी | आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनवाढीवर भर**

**● शेवगाव | वीरभूमी–**

माजी पंचायत समिती सदस्य नंदकिशोर वाघमारे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेवगाव येथे झालेल्या बैठकीत त्यांची मनसेच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.



यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे म्हणाले की, नंदकिशोर वाघमारे यांना पंचायत समिती सदस्य म्हणून काम करण्याचा आणि निवडणुकीचा अनुभव आहे. जनतेचा पाठिंबा असल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा शेवगाव शहरातील पक्ष संघटना वाढीसाठी होईल. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या दृष्टीने त्यांनी आतापासूनच शहरात जोमाने कामाला सुरुवात करावी, असे आवाहनही पालवे यांनी केले.

नवनियुक्त शहराध्यक्ष नंदकिशोर वाघमारे म्हणाले की, जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवून माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो सार्थ ठरवेन. राजसाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेले काम शहरात करून दाखवू. तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे यांच्या सहकार्याने शहरात सक्षम संघटन उभे करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या वेळी मनसेचे तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे, पाथर्डी तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, गोरख वाघमारे, किसन कर्डिले, भारत इथापे, अशोक डमाळ, शायद शेख, अंबादास काळे, गणेश गांगे, सचिन गुजर, डोईफोडे मिस्त्री, गणेश बाबर यांच्यासह शहरातील मनसैनिक उपस्थित होते.

# पारनेरमधील पशुसंवर्धन विभागाची रिक्त पदे भरा : आ. काशिनाथ दाते

**मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन | ५६ मंजूर पदांपैकी ३३ रिक्त, लवकर नियुक्त्या करण्याचे आश्वासन**

**● पारनेर | वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी राज्याच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. ग्रामीण भागातील पशुधन आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी रिक्त पदांवर तातडीने नियुक्त्या करण्याची मागणी त्यांनी केली. या मागणीची दखल घेत संबंधित पदांवर लवकरात लवकर नियुक्त्या करण्यात येतील, असे आश्वासन मंत्री मुंडे यांनी दिले.

पारनेर तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. मात्र, पशुसंवर्धन विभागात पुरेसे मनुष्यबळ नसल्याने पशुधनाची आरोग्य तपासणी, वेळेवर उपचार, लसीकरण तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना अडचणी येत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन आमदार दाते यांनी शेतकरी आणि पशुपालकांच्या हितासाठी हा प्रश्न थेट मंत्र्यांसमोर मांडला.

पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागात एकूण ५६ पदे मंजूर असून, त्यापैकी केवळ २३ पदे भरलेली आहेत, तर ३३ पदे रिक्त आहेत. म्हणजेच मंजूर पदांपैकी सुमारे ५९ टक्के पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण पडत आहे.

रिक्त पदांचा तपशील पुढीलप्रमाणे : सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन : मंजूर २, रिक्त २, पशुवैद्यकीय अधिकारी : मंजूर १६, रिक्त ११, पशुधन विकास अधिकारी, गट-ब : मंजूर १, रिक्त १, पशुधन पर्यवेक्षक/सहाय्यक पशुधन विकास अधिकारी : मंजूर १६, रिक्त १०, परिचर : मंजूर १६, रिक्त ९ अशी आहेत.



या रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुपालकांना वेळेत पशुवैद्यकीय सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मनुष्यबळ वाढवून विभागाचे कामकाज अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

या भेटीप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक तथा पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत गायकवाड आणि पारनेर शहराचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता शेठ कुलट उपस्थित होते. तालुक्यातील पशुपालकांना तत्पर आणि दर्जेदार पशुधन आरोग्य सेवा मिळावी, यासाठी आमदार दाते यांनी केलेला हा पाठपुरावा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### पदभरतीमुळे पशुपालकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा

■ पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांचा प्रश्न केवळ प्रशासकीय बाब नसून, तो पशुपालकांच्या दैनंदिन गरजा, पशुधनाचे आरोग्य आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याशी संबंधित आहे. हा प्रश्न शासनस्तरावर मांडला असून, मंत्र्यांनी लवकर नियुक्त्या करण्याचे आश्वासन दिल्याने पदभरतीबाबत अपेक्षा वाढल्या आहेत.

**– आ. काशिनाथ दाते**

रिक्त पदे भरल्यामुळे पशुसंवर्धन विभागाचे कामकाज अधिक सक्षम होईल. त्यामुळे पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा आणि शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे देता येईल. या कामासाठी आमदार दाते यांचे सहकार्य मिळत आहे.

**– डॉ. अरविंद रेपाळे,** सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (प्रभारी)

रिक्त पदांबाबत आमदार दाते यांनी पाठपुरावा केला आहे. रिक्त पदे लवकरच भरण्यात येतील, हा विश्वास दिलासादायक आहे. पदभरती झाल्यास पशुपालकांना वेळेत आणि दर्जेदार पशुधन आरोग्य सेवा देणे शक्य होईल.

**– डॉ. नितीन गाडीलकर,** तालुका पशुसंवर्धन अधिकारी (प्रभारी), पारनेर